शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक,

सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महोदय/महोदया,

विद्यापीठाच्या प्रथम वर्गामध्ये प्रवेश घेणा-या सर्व मुलामुलींनी स्थानिक स्वराज्य संस्थांना भेट देण्याबाबतचे डॉ. दिपक म्हैसकर भा.प्र.से. विभागीय आयुक्त पुणे यांचे अ. शा.प्र.क्र./निवड/कावि/४५९/२०१८ दिनांक. ०३/१०/२०१८ रोजीचे पत्र आपल्या माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे.

कळावे,

आदेशान्वये

उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ 150

दि. 16 OCT 2018

डॉ. दिपक म्हैसेकर भा.प्र.से.
विभागीय आयुक्त
पुणे विभाग, पुणे

विभागीय आयुक्त कार्यालय,
विधान भवन, पुणे - ४११ ००१.
दूरध्वनी : (का.) २६३६२२२३

अ.शा.प.क्र./निवड/कावि/४५५/२०१६
दिनांक : ३/१०/२०१६

विषय :- विद्यापीठाच्या प्रथम वर्गामध्ये प्रवेश घेणाऱ्या सर्व मुलामुलींनी स्थानिक स्वराज्य संस्थांना भेट देण्याबाबत

---

संदर्भ:- १) महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे शासन निर्णय क्र.संकिर्ण२०१६/प्रक्र६८३/१६ विशि३ दि.२७जुलै २०१८.
२) राज्य निवडणुक आयोग,महाराष्ट्र यांचे पत्र क्र.रानिआ २०१८/प्रक्र१२/संशोधन दि. /९/२०१८ मधील मुद्दा क्र.५ व ६.

आदरणीय महोदय,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने शासन निर्णय संदर्भ क्र.१ व मा. राज्य निवडणुक आयोगाकडल संदर्भ क्र २ च्या पत्राची प्रत यासोबत जोडणेत आलेली आहे. कृपया त्याचे अवलोकन होणेस विनंती आहे.

१८ वर्षे वयाच्या मुलामुलींना "लोकशाही", "निवडणूका व सुशासन" या विषयीची माहिती होणेच्या दृष्टीकोनातून कृपया खालीलप्रमाणे कार्यवाही होणेस विनंती आहे.

अ) संदर्भ क्र.१ मधील शासन निर्णयात दिलेल्या निर्देशाप्रमाणे प्राधान्याने कार्यवाही करणेसाठी आपले विद्यापीठ व अधिपत्याखालील सर्व महाविद्यालयांना कळविणेत येऊन आपले स्तरावरुन त्याबाबत सातत्याने पाठपुरावा करणेत यावा.

ब) १) मा.राज्य निवडणुक आयोगाकडील संदर्भ क्र २ च्या पत्रातील मुद्दा क्र.५ नुसार विद्यापीठाच्या प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्या सर्व मुलामुलींनी स्थानिक स्वराज्य संस्थांना भेट देण्याचा नियोजनबध्द आराखडा तयार करणेची कार्यवाही प्राधान्याने करणेत यावी.

२) मा.राज्य निवडणुक आयोगाकडील संदर्भ क्र २ च्या पत्रातील मुद्दा क्र.६ नुसार विद्यापीठामध्ये "लोकशाही", "निवडणूका व सुशासन" या विषयावर दिर्घ व लघु मुदतीचे कोर्सेस सुरु करणेचे नियोजन करणेत यावे.

उपरोक्त नमूद मुद्दयांबाबत आपले स्तरावरुन योग्य ते नियोजन करुन त्याबाबतचा आराखडा तयार करणेत यावा व कार्यवाही करणेत यावी. उपरोक्त कार्यवाही बाबत माझे स्तरावर बैठक आयोजित करणेत येईल त्याबाबतचा दिनांक निश्चीत करुन आपणास कळविणेत येईल.

सदर विषयी मा. राज्य निवडणुक आयोगाकडून सातत्याने पाठपुरावा करणेत येत असून कृपया वर नमूद कार्यवाही प्राधान्याने होणेबाबत विनंती आहे.

आपले सहकार्य व योगदान हे लोकशाही सदृढ करण्यासाठी अंत्यत मोलाचे व उपयुक्त ठरणार आहे.

आपला विश्वासु
दिपक म्हैसेकर
(डॉ.दिपक म्हैसेकर)

मा.श्री.डी.बी.शिंदे
कुलगुरु
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर